रजि. नं. आर. एन. २१४०२/१९७५ रजिस्टर्ड वुईथ रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर इंडिया

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिकचे मासिक मुखपत्र

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक

रजि. नं. इ - २८२

# सन्मार्गमित्र

सन्मार्ग दर्शयेत सम्यक् । प्रेरयेत् निजकर्मणि । सन्मार्गमित्रं सर्वेषाम् । भूयात् आनंद वर्धनम् ।।

* नाशिक * वर्ष ४३ वे * अंक १ ला * एप्रिल २०१८ (मासिक) * मूल्य : ₹ १०.००

जमदग्नि सुतो वीर क्षत्रियान्तकर प्रभो। गृहाणार्घ्य मया दत्तं कृपया परमेश्वर ।।



# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था आणि समाज सहाय्यक संस्था, नाशिक

## * कार्यकारिणी *



ॲड. गोखले
गणेश वंसत
अध्यक्ष



ॲड. गोरवाडकर
नागनाथ मोहन
उपाध्यक्ष




सौ. मवाळ
सुजाता सुहास
उपाध्यक्षा



श्री. मुंगी
उदयकुमार दत्तात्रय
कार्याध्यक्ष



श्री. चिपळूणकर
अजित मधुकर
कार्यवाह



श्री. गांधी
मिलिंद शांताराम
कोषाध्यक्ष



श्री. कुलकर्णी
गंगाधर नारायण
सहकार्यवाह



श्री. सावजी
पांडुरंग वासुदेव
आधारस्तंभ



श्री. पाडेकर
सचिन सुरेश
देणगीदार



श्री. जोशी
चंद्रशेखर रामचंद्र
आश्रयदाता



सौ. जोशी अनघा
नारायण
सदस्या



श्री. जोशी
श्रीकांत चंद्रकांत
सदस्य




श्री. जोशी
अशोक पांडुरंग
सदस्य



श्री. सबनीस
सुभाष प्रभाकर
सदस्य



श्री. पंचाक्षरी
उल्हास एकनाथ
सदस्य



श्री. कुलकर्णी
विनोद केशव
सदस्य



श्री. कुलकर्णी
पवन अरुण
सदस्य



श्री. कुलकर्णी
सुभाष शंभुराव
सदस्य



श्री. देशमुख
गजानन विठ्ठल
सदस्य



सौ. गिजरे
शैला भालचंद्र
सदस्या

# संपादकीय मनोगत

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेने गेल्या ४५ वर्षात आपल्या समाजाच्या एकत्रीकरणाचा, किंबहुना अखिल ब्राह्मण समाजात वैचारीक जागरण करण्याच्या कार्यात आपला खारीचा वाटा उचलला आहे. सभासदांचे प्रोत्साहन व आग्रह यामुळे अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे मुखपत्र म्हणुन 'सन्मार्गमित्र' हे प्रसिध्द करण्यास सुरुवात केली. परंतु मधल्या काळात गेली काही वर्षे हे मुखपत्र बंद पडलेले होते. सध्या असलेल्या कार्यकारीणीने कार्यभार हाती घेतल्यानंतर प्रयत्नांती हे मुखपत्र आता पुन्हा नव्या जोमाने सुरु करतो आहोत.



या मुखपत्राचा सक्तीच्या विश्रांती नंतरचा हा पहिला अंक आपल्या हाती सोपवतांना संपादक म्हणून मला विशेष आनंद होत आहे. या अंकापासुन, महिनाभरात घडलेल्या काही निवडक घटनांचा मागोवा वाचकांशी हितगूज, संस्था उपक्रम, केंद्र उपक्रम या बरोबरच समाजातील विचारवंताचे लेख अथवा मनोगत वाचकांपर्यंत पोहचवण्याचा मानस आहे. आपल्या समाज बांधवांशी, वाचकांशी स्नेहाचा बंध विणला जावा व या सर्वजणांनी संस्थेशी जोडले जावे या सद्हेतूने या अंकाची मांडणी असणार आहे. वाचकांना विनंती आहे की, आपल्या परिचितांची वार्षिक वर्गणी गोळा करुन संस्थेकडे पाठविली तर या उपक्रमाचे आपल्या समाजातील स्थान बळकट होण्यास मदत होणार आहे. वाचकांचे प्रेम व सहकार्य हिच आमच्या कार्याची ऊर्जा आहे.

या अंकामध्ये संस्थेच्या २०१७ च्या नुकत्याच संपन्न झालेल्या समाजगौरव पुरस्कार वितरण समारंभाचा वृत्तांत. समाज गौरवार्थी व्यक्तींचा परिचय, प्रमुख पाहुण्यांचा परिचय, असा वाचनानंद देणारा हा नव्याने प्रसिध्द होणारा पहिला अंक अक्षयतृतीयेच्या अमृतमुहूर्तावर व भगवान परशुराम यांच्या जयंतीच्या दिवशी प्रकाशित होत आहे. ही आपणासर्वांसाठी आनंदाची बाब आहे.

'सर्वांसोबत सर्वांसाठी' हे ब्रीद घेऊन कार्य करणाऱ्या अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचा संदेश सभासद व समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य 'सन्मार्गमित्र' निश्चितच करेल असे मी संपादक म्हणून आपणा सर्वांना अश्वस्त करतो.

जे आपल्याला माहीत आहे ते दुसऱ्याला सांगावे यामुळे आपल्या व्यक्तिमत्वा बरोबरच दुसऱ्याचा व्यक्तिमत्व विकास होत असतो. हि प्रक्रिया निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आम्ही हे काम नेटाने करणार आहोतच पण अशा कार्यासाठी शक्तीदायी विचारांची सोबत आवश्यक असते. अशा सोबतीचे आम्ही भुकेले आहोत. आमची ही भुक भागविण्याचे कार्य सभासद आणि वाचकांनी करावे हीच अपेक्षा आहे. या राष्ट्राची हानी दुर्जनांच्या दुष्टतेमुळे झाली त्याहून अधिक ती सज्जनांच्या निष्क्रियतेमुळे झाली, असे थोर विचारवंत आर्य चाणक्य म्हणतात. अशा सज्जन शक्तीला संघटीत आणि सक्रिय करण्यासाठी जी प्रेरक शक्ती लागते ती प्रेरक शक्ती 'सन्मार्गमित्र' होऊ पाहत आहे.

विस्तार हेच जीवन अन् संकुचितपणा म्हणजे मृत्यू. बदलत्या सामाजिकतेचे भान ठेवून वाचकाला बहुश्रूत करण्यासाठी एक चळवळ म्हणून या 'सन्मार्गमित्र'कडे आपण पाहावे, कारण हे एक वाचकाच्या मनावर संस्कार करणारे त्याला सन्मार्गाचा मार्ग दाखविणारे मासिक आहे हे लक्षात घ्यावे.

संस्थेचा पदाधिकाऱ्यांनी मोठ्या विश्वासाने माझ्यावर संपादक म्हणून जबाबदारी सोपविली त्याद्दल मी या सर्वांचा आभारी आहे.

**सुभाष सबनीस**
संपादक, भ्रमणभाष : ९८८१२४८४२९


# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था

जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबल जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक - ४२२ ००२. फोन : २३१३५९९

**Website : abmsanstha.org • Email : abmnsk@gmail.com, sanmargmitra2018@gmail.com**

संपादक **सुभाष सबनीस** | वार्षिक वर्गणी ₹ १००.०० | प्रकाशक **उदयकुमार मुंगी**

**संपादक सहाय्य मंडळ : अजित चिपळूणकर, ॲड.समीर जोशी, प्रा.लक्ष्मीकांत भट, सौ.अश्विनी पेशकार**

'सन्मार्ग मित्र' हे मासिक मालक अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था यांचेसाठी प्रकाशक उदयकुमार दत्तात्रय मुंगी यांनी रीप्लिका प्रिंटर्स, २ चिटको सेंटर, वकीलवाडी नाशिक येथे छापून अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था जलशुद्धीकरण केंद्राशेजारी त्र्यंबकरोड नाशिक ४२२००२ येथे प्रसिध्द केले. संपादक सुभाष प्रभाकर सबनीस (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक आणि अ.ब्रा.म.संस्था सहमत असेलच असे नाही)

# सुवर्णसंधी शुभारंभानिमित्त फक्त रु. ५००/- मध्ये विवाह इच्छुकांची नोंदणी मुदत ३१ मे २०१८ पर्यंत

संस्थेच्यावतीने लवकरच सर्वसमावेशक अशी विघ्नहर्ता वधु-वर सहाय्यक मंडळ या नावाने एक अतिशय उत्कृष्ट वेबसाईट तयार करण्यात येत आहे. या वेबसाईटच्या सहाय्याने कोणत्याही जाती-धर्माचे लोक अनुरूप अशा वधु-वराची निवड करू शकतील. या वेबसाईटचे वैशिष्ट्य असे असेल की, आपण अगदी मोबाईलवर सुध्दा या वेबसाईटचा वापर करू शकता. या वेबसाईटवर आपले नाव नोंदणी करण्यासाठी आवश्यक असणारी फी सुध्दा आपण मोबाईलच्या माध्यमातून भरू शकता. अशा सर्व सोयीनीयुक्त मराठी व इंग्रजी भाषेची सोय असलेली हि वेबसाईट प्रत्येकासाठी उपयोगी ठरणार आहे. ज्यांची नोंदणी करावयाची असेल त्यांचे **आधारकार्ड** या ठिकाणी आपणास पाहावयास मिळेल. म्हणजेच या वेबसाईटवर नोंदणी झालेल्या इच्छुकांची माहिती आपल्याला तपासून पाहणे सोयीचे होईल. अशी सोय असलेली हि पहिली वेबसाईट असावी. सर्व सभासद तसेच सर्व जाती धर्माच्या नागरिकांना आवाहन करण्यात येते की, प्रत्येकाने या वेबसाईटला भेट द्यावी व आपल्याला आवश्यक ती माहिती भरून वधु-वर निवड करावी हि नम्र विनंती.

## अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था व समाज सहाय्यक संस्था, नाशिक संचलित

# विघ्नहर्ता वधु-वर सहाय्यक मंडळ

## vighnahartamatrimony.com

**हि वेबसाईट सर्व जाती धर्मियांच्या उपवर-वधू करीता सुरू करण्यात येत असून इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| वेबसाईटच्या शुभारंभा निमित्त खास सवलतीच्या दरात आपण आपले नाव नोंदवू शकतात. | सवलतीचा दर<br>रु. : ५००/-<br>कालावधी : १ वर्ष |

**१ जून २०१८ पासून सदर वेबसाईवर नोंदणी फक्त ऑनलाईनच करता येणार असून त्याचे दर खालील प्रमाणे असतील.**

| | |
|---|---|
| ३ महिन्यांकरीता : १०००/- | १ वर्षासाठी : ३०००/- |
| ६ महिन्यांकरीता : २०००/- | १ वर्षानंतर नुतनीकरणास : १०००/- |

*** ऑफ लाईन नाव नोंदणी फॉर्मसाठी संपर्क ***

| | | | |
|---|---|---|---|
| नाशिक | : +९१ २५३ २३१३५९९ | विश्रांतवाडी, पुणे | : ९४२१०११८०० |
| नाशिक (पंचवटी) | : ७९७२२४२१६५ | फलटण | : ९८६०७२८६९८, ९४२१८८१५६३ |
| पुणे | : +९१ ०२० २४४३६९२२ | शिरूर | : ९८२२२६९९६१ |
| जुन्नर | : ९९७५६०३७७६ | निरा (पुरंदर) | : ९८२३३२६६८४ |

**३१ मे २०१८ पूर्वी फॉर्म भरून वरील ठिकाणी जमा करावेत.**

# समाज गौरव पुरस्कार वितरण शुभहस्ते प. पू. शरदश्चंद्र प्रतापे महाराज, श्रीक्षेत्र भालोद (गुजरात)



१९८३ साली परमहंस परिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज (म्हणजेच टेंबे स्वामी) यांच्याकडून स्वप्नदिक्षा प्राप्त झाली.

महाराजांचे शिक्षण एम.ए. एल.एल.बी. असून महाराजांनी जर्नालिझमची पदवी हि संपादन केलेली आहे. महाराज पूर्वाश्रमीचे दैनिक तरुण भारत सोलापूरचे उपसंपादक होत.

महाराज सोलापूरला असतांना त्यांना काही कामानिमीत्त कर्नाटकातील कुरवपुर येथे गेले असता दृष्टांताद्वारे नर्मदा किनारी जाण्याचा आदेश झाला. लगेचच श्री दत्तप्रभूंच्या आंतरिक प्रेरणेने नोकरीचा तात्काळ राजीनामा देवून दत्त सेवेचे व्रत घेवून नर्मदा परिक्रमेस सुरुवात केली. १९८९ ते १९९१ या कालावधीत त्यांनी दोन परिक्रमा पूर्ण केल्या. या परिक्रमा कालावधीत अतिशय खडतर ताप–साधना, अनुष्ठाने पूर्ण केली. परीक्रमेनंतर नारेश्वर येथे वास्तव्यास असतांना महाराजांनी गुरुचरित्राची सलग १०८ पारायणे केली. या पारायणाच्या कालावधीत ते फक्त ताकच घेत असत.

महाराज हे प्रसिध्दी परान्मुख असून ते कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होत नाहीत कोठेही प्रवचन कीर्तन करीत नाहीत. अगदी बोलता बोलता समोरच्या व्यक्तीचे प्रबोधन/मार्गदर्शन करतात. या कार्यक्रमाला येण्यासाठी महाराजांनी येण्याचे कबुल केले हि आपल्यासाठी भाग्याची गोष्ट आहे.

नर्मदामाईची पायी परिक्रमा करणाऱ्या भाविकांची सेवा करणे, त्याची सोय करणे हाच त्यांच्या सेवेचा उद्देश आहे. परिक्रमा करणाऱ्या भाविकांना चहापाणी, जेवण, तसेच औषधोपचार या सर्व सेवा महाराजांच्या आत्रेय आश्रमात विनामुल्या उपलब्ध करून देतात. दररोज सरासरी ५० व्यक्ती या ठिकाणी जेवण घेतात. याठिकाणी कोणत्याही प्रकारचा उच्च–नीच, गरीब–श्रीमंत असा भेदभाव नाही. याठिकाणी होणारे दत्तजयंती, नर्मदाजयंती, दत्तयाग हे सोहळे मोठ्या आनंदाने साजरे केले जातात.

महाराज मूळ अकोला विदर्भ येथील असून त्यांचे शिक्षण अमरावती येथे झाले, एल. एल.बी.चे शिक्षण नाशिक येथे पूर्ण केले आहे.

दत्ताचे निस्सिम भक्त असलेल्या प्रतापे महाराजांचे गुरुचरित्र मुखोद्गत आहे. महाराज उच्च विद्याविभूषित व पूर्वाश्रमीचे पत्रकार असल्यामुळे त्यांच्याजवळ अंधश्रद्धा या शद्बालाही थारा नाही. ते येणाऱ्या भाविकांचे प्रश्न, प्रापंचिक अडचणी सोडविताना अतिशय तन्मयतेने व प्रेमाने मार्गदर्शन करून सोडवितात. आपल्याशी गप्पा गोष्टी करीतच आपल्याला दत्तभक्ती व अध्यात्माविषयी गोडी निर्माण करीत असतात हे आपल्यालाही कळत नाही. समस्त महिलावर्गाचे ते वडीलच आहेत. भालोद हे महिलांचे माहेरघर आहे असे म्हटले जाते. तसेच पुरुषालाही माहेर असते हे भालोदला गेल्यावरच समजते.

महाराजांच्या आत्रेय आश्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार होत नाही. कोणतीही पावती फाडली जात नाही. ज्या कोणाला पैसे द्यायचे असतील त्यांनी मंदिरातील दानपेटीत टाकावे असा दंडक आहे. एवढे करूनही येथे कधीही कशाचीही कमी नसते.

महाराजांची रहाणी अत्यंत साधी असून आलेल्या प्रत्येकाचे आदरातिथ्य करणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. गुरुचरित्राचा दररोज एक अध्याय वाचण्याचा त्यांचा परिपाठ आहे.

दत्तप्रभूंच्या सेवेसाठी स्वप्नातील दृष्टांताला आदेश मानून सर्वसंग परित्याग करणाऱ्या महाराजांच्याविषयी ऐकतांना राजा हरिश्चंद्राची आठवण झाल्याशिवाय रहात नाही.

**।। गुरुकृपाही केवलं शिशत्वमं सदा मंगलम् ।।**

या उक्तीप्रमाणे प्रत्येकाला त्यांची अनुभूती आल्याशिवाय राहत नाही हेच खरे.

---

## पंचवटी केंद्राच्यावतीने नववर्ष स्वागत यात्रा उत्साहात संपन्न

दि. १८ मार्च २०१८ गुढीपाडवाच्या निमित्ताने राष्ट्रीय विकास मंच अंतर्गत पंचवटी विभागामार्फत नववर्ष स्वागत यात्रा काढण्यात आली होती. यावेळेस पंचवटी केंद्राने सक्रीय सहभाग नोंदविला.

नववर्ष स्वागत यात्रेत महिलांचे लेझीम पथक व ध्वज पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकात पंचवटी केंद्रातील सौ. विद्या कुलकर्णी, सौ. प्रज्ञा वणीकर, सौ. सुरेखा गायधनी, सौ. मिनल कुलकर्णी आदि महिलांनी सहभाग घेतला होता. तसेच सदर पथकाच्या व्यवस्थेकामी श्री. संजय कुलकर्णी व श्री. चंद्रशेखर गायधनी, श्री. उल्हास पंचाक्षरी यांनी काम केले. तसेच संपूर्ण नववर्ष स्वागत यात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी पाण्याची व्यवस्था पंचवटी केंद्राचे उपकेंद्रप्रमुख श्री. चंद्रशेखर जोशी यांनी केली होती.

# समाज गौरव पुरस्काराचे मानकरी

## वेदशास्त्र संपन्न शांताराम शास्त्री भानोसे



शांताराम शास्त्री म्हणजे आपल्या नाशिकच्या मानबिंदुपैकी एक नाव. वैदिक क्षेत्रातील अनेक मानाच्या उपाधी त्यांनी प्राप्त केलेल्या आहेत. कोविद, चूडामणी, मार्तंड, वेदालंकार अशा पदव्या म्हणजे आपल्या नेहमीच्या स्नातकोत्तर पदव्या होय. शास्त्रीच्या कार्याची दखल घेऊन त्याना भारत संस्कृत परिषद, नवी दिल्ली, अखिल भारतीय वेदमहोत्सव, इंदोर, वैदिकप्रचार संघ, जयपूर, चतुर्वेदेश्वर धाम, सावरगाव, वेदांग आयुर्वेद विद्यापीठ इंदोर, कैलासमठ नाशिक, अखिल ब्राह्मण संस्था, शिर्डी या संस्थांनी सन्मानित केलेले आहे. शास्त्रींनी अमेरिका, येथे झालेल्या संस्कृत संमेलनात व विष्णूयागात सहभाग नोंदविलेला असून तेथे इंडालॉजिकल रिसर्च सेंटरची स्थापना केली आहे. १९८९ पासून आजपर्यंत वेद आणि संस्कृत विषयावरील अनेक लेख मासिके, दैनिकांमध्ये प्रसिध्द झालेले असून आयुर्वेद विशेषांकातील धर्म, आयुर्वेद आणि संस्कृती या लेखाला विशेषत्वाने गौरविण्यात आलेले होते. १९९२ मध्ये महर्षी वेद विज्ञान विद्यापीठ, नवी दिल्ली येथे वैदिक पाठ्यक्रमाची पुनर्रचना करून वेदांचा अभ्यासक्रम सुरळीत चालवण्यासाठी जी समिती विद्यापीठाने गठीत केली आहे त्याचे सदस्य म्हणून शास्त्री काम करीत आहे. गेल्या १८ वर्षांपासून गुरुकुल पध्दतीचे वैदिक शिक्षण अनेक विद्यार्थ्यांना देणे चालू आहे. निवासी पध्दतीने ५० विद्यार्थी गुरुकुलमध्ये राहत असून या गुरुकुल म्हणजेच वेदापाठशाळेचे मुख्य विश्वस्त व प्राचार्य म्हणून शास्त्री काम पाहत आहेत. श्रीक्षेत्र वडनगर (गुजरात) येथील महर्षी योगीश्वर याज्ञवल्क्य यांच्या जन्मस्थानाचा विकास व्हावा म्हणून महर्षी योगीश्वर याज्ञवल्क्य जन्मस्थान विकास ट्रस्ट स्थापन केला असून ते आजही त्याचे अध्यक्ष आहेत. अखिल भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे नाशिक येथे जे अधिवेशन झाले त्याचे समन्वयक म्हणून त्यांनी भूमिका बजावली होती. १९९९ मध्ये नाशिक येथे भारतरत्न लता मंगेशकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वैदिक संमेलनाचे संयोजक म्हणून त्यांनी काम केले होते. विविध ठिकाणी झालेल्या अखिल भारतीय वेद संमेलनात त्यानी सहभाग नोंदविला आहे. अनेक संमेलनांमध्ये व्याख्यानांच्या सहाय्याने प्रबोधनाचे काम ते करीत असतात. याबरोबरच ते नाशिक जिल्हा प्रवासी संघटनेचे सदस्य म्हणून काम करीत आहेत. नाशिकमध्ये झालेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे पर्यटन समितीचे प्रमुख म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे.

---

## मुकुंद नारायण कुलकर्णी



मुळचे चावी तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर येथील. ब्राह्मण समाज सेवा संघाच्या डॉ. घाटी अनाथ विद्यार्थी वसतिगृहात राहून शिक्षण पूर्ण केले. मेकॅनिकल इंजिनियर असलेया मुकुंदरावांनी सुरवातीची १५ वर्षे दुबई, कुवेत, इतर गल्फ देशात तसेच यु.पी. एम.पी., मद्रास अशा अनेक राज्यात नोकरी केली. १९९६ पासून स्वतःचा व्यवसाय सुरु केला व आज एस.एम. ऑटो स्टम्पिंग व एस. एम. ऑटो व्हिजन प्रा. लि. या नावाने कंपनी सुरु केली आज रोजी त्यांचे चार युनिट आहेत. जवळपास ३५० ते ४०० कर्मचारी तेथे काम करीत असून ५० ते ६० करोडचा टर्नओव्हर या कंपनीचा आहे. या कंपनीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे सर्व कामगार कुटुंबासारखे राहतात. दररोज कामाची सुरुवात प्रार्थनेने होते. त्यांच्या कंपनीत कोणतीही युनियन नाही. याबरोबरच ते अनेक संस्थांशी जोडले गेलेले आहेत. व तेथेही मनापासून काम करतात. उदा. ब्राह्मण सभा नाशिकरोडचे अध्यक्ष, बीबीएनजीचे संस्थापक सदस्य असून आजही ते कोर कमिटी सदस्य आहेत. देशस्थ ऋग्वेदी संस्थेचे विश्वस्त व आता अध्यक्ष म्हणून काम पाहात आहेत. त्याचप्रमाणे अनेक ब्राह्मण संस्थाना सपोर्टर म्हणून काम करीत आहेत. जनकल्याण रक्तपेढीच्या रक्तदान शिबिराचे संयोजक म्हणून ते काम करीत आहेत. आजपर्यंत त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले असून त्यात प्रामुख्याने नाशिक औद्योगिक असोसिएशानचा निमा एक्सलन्स पुरस्कार देशस्थ ऋग्वेदी संस्थेचा जीवन गौरव पुरस्कार बीबीएनजी या संस्थेकडून उद्यम कौस्तुभ हा पुरस्कार, इंडियन इकॉनॉमिक फोरमकडून उद्योग भारती पुरस्कार. अनेक ग्राहकांकडून गुणवत्ता आणि तत्पर सेवेबद्दल अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. मुकुंदरावांच्या एकूण कारकिर्दीला सलाम म्हणून हा समाजगौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

**‘सन्मार्ग मित्र’ - सर्वांसाठी, सर्वांसोबत...!**

## डॉ. गिरीश कुलकर्णी



स्नेहालय म्हटले की, आपसूकच नाव येते गिरीश सर आणि गिरीश कुलकर्णी म्हटले की, स्नेहालयाची आठवण येतेच येते. अनौरस, बेवारस बालके, कुमारी व अत्याचारित माता यांच्या पुनर्वसनाचा परिपूर्ण आणि अत्यंत दुर्मिळ असा दृष्टीकोन स्नेहांकुरने विकसित केला आहे. बालकाप्रमाणेच मातांचे पुनर्वसन, सामाजिक पुनर्घटन झाले नाही तर हा प्रश्न सोडविताना काही नवे प्रश्न निर्माण होतात. याचे नेमके भान ठेवून स्नेहांकुरने कुमारी व अत्याचारित मातासाठी भारत माता केंद्र उभे केले आहे. भारत मातेची सेवा करायची ती केवळ चित्रात व कल्पनेत न करता उध्वस्ततेच्या ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेल्या महिला व बालके व मुलींमध्ये पाहणे याला सेवा कार्याची अलौकिक दृष्टी लागते, ती दृष्टी असलेला माणूस नव्हे एक संस्था म्हणजेच गिरीश कुलकर्णी. स्नेहालायाचे अनेक उपक्रम आहेत. जसे की, सेवावस्तीमधील बालभवन, चाईल्ड लाईन – बालहक्क संरक्षण, आयटी सेंटर, स्नेहांकुर दत्तक विधान केंद्र, मतीमंद, स्वमग्न बाल पुनर्वसन केंद्र, हिंमतग्राम पुनर्वसन वसाहत, अनाम प्रेम – अंध, अपंग, मूकबधीर यांचे पुनर्वसन, स्नेहाधार–अत्याचारग्रस्त महिलांना आधार, रेडिओ नगर ९०.४ एफ एम केंद्र, शारदा बालभवन, कात्रज (पुणे), स्नेहालय करियर अकादमी असे अनेक उपक्रम आहेत. अगदी तरुण वयात जेव्हा तरुणाई अनुभवायची अशा काळात गिरीश कुलकर्णी यांनी हि अवघड वाट निवडली आणि अतिशय छोट्या स्वरूपातील कार्याचा आज झालेला वटवृक्ष हि त्यांच्या मधील देवत्वाची साक्ष देतो म्हणून काही त्यांना देव म्हणावे असे नाही. पण आपण कोठे देव पाहिला? आपल्याला देव पाहायचा असेल तर आपण सर्वांनी जरूर अहमदनगरला जावे आणि स्नेहालयला भेट द्यावी. खिशात पैसे नसताना सुरु केलेले हे कार्य आज खूप मोठे काम करीत आहे. शासन, सरकार काय करील एवढे मोठे काम गिरीशजींनी उभे केले आहे. गिरीश कुलकर्णी यांनी सुरु केलेल्या या कार्याचा सन्मान म्हणून आम्ही त्यांचा समाजगौरव पुरस्कार देवून सन्मान केला आहे. त्यांना आजपर्यंत अनेक सन्मान पुरस्कार मिळालेले आहेत. बाबा आमटे, गाडगे महाराज यांनी जे काम केले त्या तोडीचे काम कारणाऱ्या गिरीश कुलकर्णी यांना आमचा मानाचा मुजरा.

---

## सागर शशिकांत तळाशीकर



सिनेमा नाटक आणि टी.व्ही. मालिकांमध्ये काम करणारे अभिनेते. यांच्या आजपर्यंतच्या कारकीर्दीचा आढावा घेताना त्यांची भूमिका असलेली नाटके म्हणजे, राजा लियर, राशोमान, अंधार यात्रा, सत्यशोधक, दुशिंगराव आणि त्याचा माणूस, पाहिजे जातीचे, पिंजरा, अश्रूंची झाली फुले, नवरा माझ्या मुठीत, गणनायक अशी जवळपास पंचवीस नाटके. व्यावसायिक नाटकामध्ये प्रामुख्याने डबल गेम आणि रंगनायक हि नाटके. चित्रपटसृष्टीमधील त्यांच्या कारकिर्दीकडे पाहावयाचे झाल्यास सोनियाची पावले, बहिणी बहिणी, अगं प्रिये तू कुणाची, विधीलिखीत यामध्ये प्रमुख भूमिका, बालगंधर्व या सिनेमात नानासाहेब जोगळेकर यांची भूमिका. तसेच गुलदस्ता, सद्रक्षणाय, अरे देवा, ध्यासपर्व, दुर्गे दुर्घट भारी, आमची दिदी, होत असं कधी कधी, रास्ता रोको या सिनेमातही महत्वाच्या भूमिका केलेल्या आहेत. या मराठी सिनेमा बरोबरच हार्ट बिट्स व इट्स ब्रेकिंग न्यूज हे हिंदी सिनेमे, हँगमॅन हा इंग्रजी सिनेमाही त्यांच्या नावावर आहे. आपल्या रोजच्या जीवनाशी संलग्न असलेल्या चार दिवस सासूचे, गुंतता हृदय हे, असंभव, सोनियाचा उंबरा, अवंतिका, एक धागा सुखाचा, भूमिका, वर्तमान, बंधन, रुणुझूणु, सांजसावल्या, व्यक्ती आणि वल्ली, खेळ मांडला, चारचौघी, सौभाग्यकांक्षिणी, परत येशील का?, महापर्व, पिंपळपान, रेशीमगाठी, थरार, कुरुक्षेत्र, या सुखांनो, कशाला उद्याची बात, तशीच नुकतीच संपलेली प्रवाह वाहिनी वरील रुद्रम या मालिकांमध्ये अतिशय उत्तम काम केलेले आहे. सागरजींनी अनेक लघुपट, जाहिरातींमध्ये काम केलेले आहे. उदा. डीएसके विश्व, बिर्ला प्लस सिमेंट, केसरी टूर्स, पितांबरी, महाबीज खत. हे काम करीत असताना त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने दुशिंगराव आणि त्याचा माणूस तसेच राजा लियर या नाटकांना मिळालेले राज्यशासनाचे पुरस्कार, डबलगेम या नाटकाला मिळालेला नाट्यगौरव पुरस्कार गुंतता हृदय या मालिकेतील मयंक या पुरुष व्यक्तिरेखेसाठी मिळालेला झी गौरव पुरस्कार. या पुरस्कारांचा समावेश होतो. सागर तळाशीकर यांच्या या कारकिर्दीसाठी कला विभागातील या वर्षीचा समाज गौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

**'सन्मार्ग मित्र' - सर्वांसाठी, सर्वांसोबत...!**

**श्रीमती लता माने.**

श्रीमती लता माने या मुळच्या कर्नाटकातील कार्गा या गावच्या. १९९८ साली मोठ्या विश्वासाने पतीसोबत मुंबईला आल्या. त्याने त्यांना कामाठीपुरा येथील कुंटणखाण्यात विकले व देहविक्रय करायला भाग पाडले. याच व्यवसायातून ओळख झालेल्या एका ग्राहकाशी त्यांनी लग्न केले. दोन मुले झाल्यावर तोही सोडून गेला. २००२ साली विजय क्रीडा मंडळ या संस्थेशी त्यांचा परिचय झाला. संस्थेच्यावतीने देहविक्रय करणाऱ्या महिलांसाठी 'दिशा' नामक एड्स प्रतिबंधात्मक उपक्रम सुरु झाला. त्यामध्ये पिअर एज्युकेटर म्हणून लता माने यांना नियुक्त करण्यात आले. काहीही लिहिता वाचता येत नसल्यामुळे 'दिशा' प्रकल्पात येताच त्यांनी इतर कार्यकर्त्यांच्या सहाय्याने लिहिण्या वाचण्यास शिकून घेतले. देहविक्रय करणाऱ्या महिलांना भेडसावणाऱ्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी त्यांनी स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून २००६ साली दिशा बचत गटाची स्थापना केली. बँकेत अशा महिलांचे खाते सुरु करता येणार नाही असे बँक व्यवस्थापनाने सांगितल्यावर सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या अधिकाऱ्याच्या मागे लागून बँकेत खाते सुरु करून घेतली. स्वतः विविध प्रकारची आभूषणे, सुगंधी द्रव्ये बनविण्याचे प्रशिक्षण घेऊन या महिलांसाठी असे उद्योग सुरु केले. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत अनुदान, कर्ज मिळवून त्या कर्जाची नियमित कर्जफेड केली म्हणून शासनाने त्यांना सव्वालाखाचे अनुदान मंजूर केले. देहविक्रय करणाऱ्या महिलांसाठी वेळप्रसंगी स्वतः झळ सोसून लाच देण्यास नकार देऊन आपले कार्य त्या पुढे नेत आहेत. या कार्याचा गौरव म्हणून कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीच्यावतीने आरोग्य क्षेत्रात केलेल्या समाजकार्याबद्दल २०१४ साली त्यांना आदर्श स्त्री म्हणून दीडलाख रुपये व सन्मानपत्र देवून केंद्रीय मंत्री आनंद शर्मा यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यामुळेच त्यांना आजतक, सह्याद्री वाहिनीवरील सखी, झी २४ तासच्या श्रावणक्विन सदरात सहभाग नोंदविला. अशाप्रकारे समाजाच्या गरजा जाणून घेऊन श्रीमती लता माने यांनी 'इच्छा असेल तर मार्ग दिसेल' या सद्‌विचारास अनुसुरून फक्त देहविक्रय करणाऱ्या महिलांसाठीच नव्हे तर तमाम महिलावर्गासमोर एक आदर्श उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. अशा या एका 'वारांगना ते वीरांगना' या प्रवासास आमच्या लाख लाख शुभेच्छा.



# ब्राह्मण संघटन – काळाची गरज

ब्राह्मण या शब्दाच्या अनेक व्याख्या, संज्ञा, व्युत्पत्ती यावर वर्षानुवर्ष कृतीहीन चर्चा व त्यावरून शब्दच्छल करण्यापेक्षा, ज्ञानार्जन आणि ज्ञानदान हे ज्यांचे ब्रीद आहे, हाच ज्याचा धर्म आहे आणि हेच ज्यांचे जीवन आहे त्याला ब्राह्मण म्हणावं. अर्थातच कालानुरूप होणारे सामाजिक बदल आणि त्या त्या व्यक्तीचे आचरण यानुसार या संज्ञेत बदल संभवतात आणि ते स्वाभाविक आहे. अशी व्यक्ती पोटार्थी होणं, काहीशी स्वार्थी होणं हे ही स्वाभाविक आहे पण म्हणूनच त्याचं संघटन तितकंच आवश्यक अहे.

हिंदू धर्माच्या शिकवणीनुसार मनुष्यप्राणी काही संस्कार उपजतच मिळवित असतो, तर जन्मानंतर त्यामध्ये वाढ होते, ती माता–पिता व समाजाकडून. संस्कार ही अंगी बाणावायची गोष्ट असल्याने ते प्रत्यक्ष कृतीतूनच दृग्गोचर होतात, व्हायला हवेत. ती काही निव्वळ देण्या–घेण्याची वा गळी उतरवण्याची बाब नव्हे. पण तरीही ब्राह्मण कुळात जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीने आपले जीवन आदर्श बनवण्यासाठी संस्कारांचा वसा घ्यायला हवा. त्याने स्वतः बरोबरच समाजाचाही आदर्श व्हायला हवं. तथापि नेमक्या याच प्रवाहापासून सांप्रत दूर गेल्यामुळे संघटनेच महत्त्व त्याने जाणून घ्यायला हवं, नव्हे ते त्याला पटवून द्यायला हवं.

समाजात आदर्श राहिलेच नाहीत असा कांगावा आम्ही करतो, खरं म्हणजे स्वत:च आदर्श व्हायचं असतं याचा आम्हाला विसर पडतो.

संघटना म्हणजे एकी. एकीचं बळ, ताकद म्हणजे आत्मविश्वासाचं प्रकटीकरण. संघटनेमुळेच व्यक्तीला समाजाला दिशा मिळते, योग्य मार्ग मिळतो आणि तो ध्येयपूर्तीसाठी आपले सर्वस्व अर्पण करतो. व्यक्ती व समाजापुढचे ध्येय सुस्पष्ट असावे. ध्येयपूर्तीसाठी अर्पणवृती लागते. आपली हिंदू संस्कृती ही त्यागावर आधारलेली आहे. कोणत्याही व्यक्तीचा व समाजाचा विकास त्याग भावनेमुळेच होतो हे निश्चित. स्वामी स्वरुपानंदासारख्या महात्म्यांचे तत्वज्ञान आपण आचरणात आणायला हवे. ते म्हणतात–

**ध्येय असावे सुदूर की कधी न हाती यावे ।**
**जीवेभावे मात्र तयाच्या प्रकाशात चालावे ।।**

स्वतःबरोबरच आपलं कुटुंब, शेजार, समाज आणि पर्यायाने राष्ट्राची उभारणी करायची तर त्यासाठी संघटन हे अत्यावश्यक आहे. ब्राम्हणांच संघटन ही बाब कठीणच अस कदाचित गंमतीने वा उपरोधाने म्हटले जाते. पण ते एकाअर्थी खरे आहे. चार विद्वानांना एकत्र आणणे किंवा चार ब्राह्मण एकत्र जमविणे कठीण. कारण

आपल्यातील मी पणा, मला काय त्याचे ही वृत्ती आपल्याला परस्परांपासून दूर ठेवते. या दोषांचं उच्चाटन आणि आम्ही वा आपण सारे याचं कृतीशील प्रकटीकरण याला अधिक महत्त्व द्यायला हवं. ब्राह्मणांना संघटनेची गरजच नाही असं वाटावं अशी कृती अनेक ब्राह्मणांकडून निरंतर होत आहे. हे वास्तव समजून घेऊन संघटनेची संकल्पना त्यांच्या मनात रुजवायला हवी.

घरातील यजमान जेवायला बसण्याआधी दारात कोणी याचक तर नाही ना याची खात्री करून मगच पानावर बसण्याची आपली संस्कृती आहे. हाच नियम जीवनातील प्रत्येक पायरीवर स्वत:ला लागू करायला हवा म्हणजे खऱ्याअर्थाने समाज एकत्र येईल अन्यथा 'एकमेका साहाय्य करू'चे नारे बोलण्यापुरतेच सिमीत राहतात. म्हणजेच आपली वृत्ती बदलायला हवी, अधिक डोळस व्हायला हवी. विचारांना विवेकाची जोड घायला हवी अन्यथा बुद्धिवादाचं समर्थन करताना बुद्धिभेद करणारे बोलभांड समाजात अधिकाराने वावरतात. ब्राह्मणाने कसे वागायला हवे यावर चर्चा करणारे अधिक, याचाच अर्थ ब्राम्हणांच जीवन आदर्श आहे हे त्यांना मान्य आहे पण आव मात्र मोठा आणायचा आणि जाऊ तिथे व्याख्याने झोडायची हे यांचे उद्योग. प्रश्न निर्माण करतांना त्याची उत्तरे शोधून कृती करावी हे या पंडितांना ठणकावून सांगायला हवे. जन्माने ब्राह्मण असणं ही तुम्हा आम्हाला मिळालेली सर्वात मोठी देणगी आहे, तिचा वापर फार जबाबदारीने करायला हवा. वडिलकीच्या नात्याने मार्गदर्शक बनून उतराई होण्याचा प्रयत्न करायला हवा. ब्राह्मण समाज सहिष्णू आहे पण 'अति सर्वत्र वर्जयेत्' या न्यायाने काही लोक 'उचलली जीभ लावली टाळ्याला' सारखे वागत आहेत. हा पुरुषार्थ नव्हे, ब्राम्हणत्वही नव्हे.

काळ हे सर्व समस्यांवर सर्वात प्रभावी औषध आहे असे म्हणतात. ब्राह्मणाला अन्य समाजापासून एकटे पडायचा प्रयत्न अनेकजण करीत आले, करीत आहेत पण ब्राह्मण म्हणजे असे रसायन आहे की, समुद्रात नेऊन बुडवले तरी बेट म्हणून वरती येईल. आपली वाट शोधणं आणि तीही आपणच हे तो पाण्यापासून शिकलाय. निसर्गाकडून मिळवणं आणि निसर्गाला परत देणं ही शिकवण त्याने अंगी बाणवली आहे. पण तरीही आपण बेसावध असता कामा नये. तुलनेनी शहरी ब्राह्मण खूपच सुरक्षित आहे पण खेड्यापाड्यातील ब्राह्मण तसा नाही. त्याला झळ लागते आहे, चटके बसताहेत. आपणसर्वांनी त्यांच्या पाठीशी भक्कम उभं राहायला हवं. काळाचा फटका त्यांना बसू नये याची खबरदारी प्रत्येक ब्राह्मणाने घ्यायला हवी. ब्राह्मण ही समाजाची गरज आहे आणि समाजाची घडी नीट बसवण्याचं कामही ब्राह्मण करतो. तो जन्माने ब्राह्मण आहे म्हणूनच हे अवधान त्याला असतं. गरजेपोटी सारेच एकत्र येतात पण तरीही टिकतो तो संस्कार, आचरण. तिच त्याची खरी ओळख.

अशा अनेक गुणांनी ब्राह्मण श्रीमंत आहे पण त्याने औदासिन्य झटकांवे, न्यूनगुंडातून बाहेर पडावे, अहंगंडाला तिलांजली द्यावी. तेज हे प्रकटल्याशिवाय राहत नाही. अंधारानी कितीही व्यापलं तरी ते मुळात असतंच; त्याचं प्रकटीकरण होणं तेवढंच बाकी असतं. ब्राह्मणाचा म्हणजेच ज्ञानाचा, संस्काराचा आदर करणं हे प्रगतीचं लक्षण आहे. कारण ब्राह्मण हा पृथ्वीतलावर राज्य करणारा अनिभिक्षित सम्राट आहे. ब्राह्मतेज आणि क्षात्रतेजांचं भगवान परशुरामांचं एकमेव उदाहरण याची साक्ष आहे.

---

## पंचवटी केंद्र - महिलादिन उत्साहात साजरा

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिक, पंचवटी केंद्राच्यावतीने दि. १० मार्च २०१८ रोजी गर्गेवाडा, भोंडे गल्ली, पंचवटी येथे महिला दिन साजरा करण्यात आला. मोठ्या उत्साहात महिलांनी या सोहळ्याला उपस्थिती लावली. या निमित्ताने पंचवटी केंद्रात महिलांसाठी वेशभूषा स्पर्धा व उखाणे स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले. या दोन्ही स्पर्धांना महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बक्षीसपात्र स्पर्धकांना या वेळी बक्षीसे देण्यात आली व प्रत्येक महिलेला एक आठवण भेट देण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. सुचिता बोरकर व परीक्षक सौ. तारामती भानुवंशे व सौ. चित्रा कुलकर्णी या होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. जान्हवी पंचाक्षरी तर आभार प्रदर्शन सौ. प्राची कुलकर्णी यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. प्रतिक्षा नातू व सौ. पद्मा गर्गे यांनी विशेष प्रयत्न केले.

## पुणे केंद्र - पाककला स्पर्धा आणि प्रदर्शन

संस्थेच्या पुणे केंद्रातर्फे सर्व समाजातील महिलांसाठी घेण्यात आलेल्या पाककला स्पर्धेत प्रगती आहिरे यांना प्रथम क्रमांक मिळाला. या स्पर्धेत ५० हून अधिक महिला सहभागी झाल्या होत्या. याचबरोबर संस्थेतर्फे पुण्यात महिलांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन व खाऊ जत्रा २३ ते २५ मार्च रोजी संपन्न झाले.

पी. एन. गाडगीळच्या संचालिका सौ. रेणू गाडगीळ यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. नगरसेविका सौ. रुपाली धाडवे व सौ. वर्षा साठे यांनी प्रदर्शनाला मुद्दामहून भेट दिली.

संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. सुजाता मवाळ, संचालिका सौ. शैला गिजरे व पुणे केंद्राच्या संचालिका सौ. सरीता काळे यांनी या प्रदर्शनाचे संयोजन केले.

जवळपास ५० ते ६० विविध वस्तूंच्या स्टॉल्सने हे प्रदर्शन सजले होते. पुणेकरांनी या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# नाशिकमध्ये कार्यरत असलेल्या ब्राह्मण संस्था

**ब्राह्मण समाज सर्व शाखाभेद विसरून एकत्र यावा यासाठी अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेची स्थापना झालेली आहे. कोणत्याही समूहाला एकत्र यावयाचे असेल, तर त्याने संघटीत होणे गरजेचे आहे. अशाप्रकारचे संघटन व्हावे या करीता आपल्या नाशिक शहरात वेगवेगळ्या जाती समूहाच्या विविध संस्था कार्यरत आहेत. नाशिक शहर आणि परिसरात वास्तव्यास असलेल्या ब्राह्मण समाजाच्या संघटनाचा विचार करीत असताना प्रामुख्याने ज्या संस्था कार्यरत आहेत त्यांची माहिती करून घेऊ. या पहिल्या अंकात आपण देशस्थ ऋग्वेदी संस्था, शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण संस्था तसेच ब्राह्मण व्यावसायिकांसाठी कार्यरत असलेल्या ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल या संस्थांची थोडक्यात माहिती करून घेवू या.**

## देशस्थ ऋग्वेदी संस्था, नाशिक

नाशिकच्या देशस्थ ऋग्वेदी संस्थेचा इतिहास फार जुना आहे. हा इतिहास सुरू होतो देवीच्या मठापासून. १८५८ पूर्वी हा मठ म्हणजे देवीचे आजचे मंदिर व त्यासमोरील मोकळी जागा. या जागेशेजारीच एक बखळ जागा होती. तेथे साधू संन्यासी रहायचे. या जागेचे मालक वेदमूर्ती राजाराम भाऊबुवा बीन गोसावी उर्फ होशिंग हे होते. हे देवीच्या मठाचे पंच ही होते. वेदमूर्ती होशिंग यांनी देवीच्या मठास ही बखळ जागा बक्षिस म्हणून दिली. तसे बक्षिसपत्रही करून दिले. या कामी श्री. जनार्दन विनायक उर्फ बाबा गरूड, श्री. नरहर रामचंद्र भातवडकर, दशपुत्रे, श्री. बाळ दिक्षित शेजवळकर, श्री. रामचंद्र गणेश महाशब्दे, श्री. भालचंद्र गोविंदभट गोऱ्हे यांनी पुढाकार घेतला. नंतर श्री. नरहर रामचंद्र भातवडकर यांनी व वरील पंचांनी ही बखळ जागा आणि देवीच्या मठाची जागा या दोन्ही जागांचे बक्षिसपत्र देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजास करून दिले. नाशिक शहराच्या मध्यवस्तीत असलेले संस्थेचे मुख्यालय, देवीचे मंदिर, तसेच दुर्गा मंगल कार्यालय शहरातील आणि नाशिक जिल्ह्यातील ब्राह्मण समाजाचे एक महत्त्वाचे ठिकाण आहे.

१९३३ साली स्थापन झालेल्या रोपाचे आज वटवृक्षात रुपांतर झालेले आहे. अर्थात हा रथ ओढायला शहरातील व जिल्ह्यातील हजारो समाजबांधवांचे हातभार लागले आहेत, हे नमूद करावेसे वाटते.

याच निमित्ताने संस्थेने अनेक प्रकल्प हाती घेण्याचा संकल्प केला आहे. समाजबांधव, संस्थेचे हितचिंतक आणि मान्यवरांच्या सहकार्यानेच हे प्रकल्प कार्यान्वित होत आहेत.

दुर्गा मंगल कार्यालयात आजपर्यंत अनेक मंगलकार्ये पार पडली आहेत व आजही होत आहेत. जस जसा शहराचा विकास होत गेला, तसतसा संस्थेचाही विकास होत गेला. मधुकाका कुलकर्णी, मधुकर कावळे यांसारख्या अनेक दिग्गज व्यक्तींमुळे संस्था मोठी होत गेली. संस्थेचा विस्तार झाला असून ऋग्वेद मंगल कार्यालय हि भव्य वस्तू तिडके कॉलनी परिसरात उभी आहे. याचे सारे श्रेय आजपर्यंत ज्या ज्या समाजधुरिणांनी संस्थेची धुरा वाहिली त्यांना जाते. संस्थेच्या सभासदांसाठी सुरु केलेली दुर्गादेवी पतसंस्था असो वा श्रीसमर्थ सहकारी बँक असो या दोन्हीही संस्था देशस्थ ऋग्वेदी संस्थेच्या माध्यमातूनच उभ्या राहिल्या आहेत. म्हणजेच या संस्थाची मातृसंस्था म्हणून देशस्थ ऋग्वेदी संस्थेकडे पाहिले पाहिजे. नुकत्याच झालेल्या संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुका संस्थेमधील कारभार कसा लोकशाही पद्धतीने चालतो हे दाखवून देणाऱ्या ठरल्या. नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. मुकुंदराव कुलकर्णी, कार्यवाह श्री. नरेंद्र कुलकर्णी, खजिनदार श्री. मकरंद सुखात्मे व त्यांचे सर्व सहकारी या संस्थेची उत्तरोतर प्रगती व्हावी म्हणून अविरत झटत आहेत.

## शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण संस्था, नाशिक



शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण संस्था ही धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेली संस्था आहे. ही संस्था सुमारे चाळीस वर्षांपेक्षा जास्त वर्षांपासून नोंदणीकृत संस्था म्हणून कार्यरत आहे. अनेक वर्षे या संस्थेच्या बैठका व उपक्रम कार्यकर्त्यांच्या घरी राबविले गेलेत. त्यानंतर अनेक वर्षे संस्थेचे कार्यालय भद्रकाली मंदिरातील पहिल्या मजल्यावर होते. त्यानंतर संस्थेने शृंगेरीपीठाच्या शंकराचार्यांकडून आत्ताच्या यजुर्वेद मंदिराचा भूखंड खरेदी करून त्यावर यजुर्वेद मंदिर नावाने ओळखली जाणारी स्वत:ची वास्तू बांधली. संस्थेच्या वास्तूचे बांधकाम करताना श्री गंगागोदावरी पंचकोठी (पुरोहित) संघ नाशिक यांचेकडून परतफेडीचे अर्थसहाय्य लाभले. संस्थेने ही जाणीव ठेऊन पुरोहित संघाने केलेल्या अर्थसहाय्याची परत फेड केली व आज सुसज्ज आणि प्रशस्त अशी बहुउपयोगी यजुर्वेद मंदिराची वास्तू गोदावरीतिरी दिमाखात उभी आहे. ब्राह्मण समाजाबरोबरच समस्त समाजही या बहुउपयोगी वास्तूचा सद्उपयोग करीत आहेत. संस्थेचे कार्यालयासाठी १५ केव्हीएचे मोठे जनरेटर उपलब्ध असून मोठ्या प्रमाणावर पार्किंगची सुविधा आहे. संस्थेचे यजुर्वार्ता दरमहा मुखपत्र प्रसिद्ध होते. त्याद्वारे

संस्थेचे झालेले उपक्रम, होणारे उपक्रम, संस्थेचे झालेले सभासद, देणगीदार, समाज बांधवांची सुख-दु:ख, अभिनंदने, विविध लेख, वधु-वरांची माहिती संस्था सभासदांसह अनेक सहकार्यकर्त्यांना हे मुखपत्र विनामूल्य पाठविले जाते. संस्थेचा मोठा बांधकाम प्रकल्प नियोजित आहे. शुक्ल यजुर्वेदिय माध्यंदिन ब्राह्मण समाज बांधवांबरोबरच सर्व शाखीय बहुभाषिक ब्राह्मण समाज व समस्त समाजाला बरोबर घेऊन एकूण समाज विकासाचे काम संस्था करीत आहे.

**संस्थेचे विविध उपक्रम** : सुसज्ज व प्रशस्त मंगल कार्यालय, यजुर्वेद मंदिर, मुखपत्र यजुर्वार्ता, महर्षी योगीश्वर याज्ञवल्क्य पाठशाळा, पुस्तक पेढी, गुणवंत गौरव, गरजु विद्यार्थ्यांना परत फेडीची शिष्यवृत्ती, सामुदायिक व्रतबंध, संस्कार वर्ग, वधु-वर सुची, वधू-वर मेळावे आरोग्य तपासणी शिबिरे, १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन, २६ जानेवारी प्रजासत्ताकदिन, विद्यार्थी मार्गदर्शन शिबिरे, महर्षी योगीश्वर याज्ञवल्क्य जयंती, महर्षी योगेश्वर याज्ञवल्क्य उत्सव, भगवान श्रीपरशूराम जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, ऋषिपंचमी आणि या निमित्ताने ऋषितुल्य व्यक्तिमत्वांचा दीपस्तंभ पुरस्काराने सन्मान. भागवत कथा, श्रीरामायण कथा, श्रीगणेशोत्सव, तसेच श्रीगणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीतील सहभागी मंडळे व भक्तांच्या स्वागतासाठी मिरवणुक मार्गावर स्वागतकक्ष, मकर संक्रांति निमित्त तीळगूळ, हळदी कुंकू समारंभ तसेच काही महत्वाकांक्षी बांधकाम प्रकल्प आदि उपक्रम राबविले जातात. शुक्ल यजुर्वेदिय माध्यंदिन संस्थेचे अध्यक्ष श्री. सतिश शुक्ल, उपाध्यक्ष श्री. माधवराव भणगे, ॲड. भानुदास शौचे, मालती कुरंभट्टी, सौ. मेधावती सातारकर, उदयकुमार मुंगी, कार्याध्यक्ष तुषार जोशी, कार्यवाह अनिल देशपांडे, कोषाध्यक्ष चंद्रकांत महाजन तसेच कार्यकारी समिती, कार्यकारी मंडळ, विशेष निमंत्रित, निमंत्रित सल्लागार व संस्थेचे सर्व विभाग यांच्या सहाय्याने संस्था समाजोपयोगी कार्य करीत आहे.

## ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल

नोकरी करत असताना स्वत:चा व्यवसाय सुरु करणारे श्री. श्रीपाद बाळकृष्ण कुलकर्णी यांनी आपला समाजबांधव आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा म्हणून सहा वर्षांपुर्वी फेसबुकवर ब्राह्मण व्यावसायिक असे पेज तयार केले. त्याला मिळालेल्या भरघोस प्रतिसादामुळे पुढचे पाऊल म्हणुन श्री. मुकुंदराव कुलकर्णी, श्री. प्रभाकर कुलकर्णी, श्री. विराज लोमटे, श्री. राजेंद्र बेडेकर यांच्या सोबतीने आणि सहकार्याने ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल अर्थात बीबीएनजीची स्थापना केली.

**बीबीएन ग्लोबल तथा ग्लोबल ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क म्हणजे नक्की काय?**

बीबीएनजी म्हणजे एक अशी यंत्रणा अथवा संस्था की, जी ब्राह्मण उद्योजकांनी ब्राह्मण उद्योजकांसाठी उभी केलेली चळवळ आहे. हि संस्था फक्त ब्राह्मण उद्योजकांच्या सर्वांगीण विकासासाठीच तयार केली गेली आहे.

प्रेरणा (Motivation) आणि प्रशिक्षण (Training) यासोबत उद्योगासाठी आवश्यक असतात ते संपर्क (Contacts) ओळखी, सहवास, मैत्र आणि मदत या सर्व गोष्टी ब्राह्मण उद्योजकाला एकाच छताखाली मिळाव्यात अशी ही यंत्रणा विकसित केली आहे. ब्राह्मण उद्योजकांनी ब्राह्मण उद्योजकांसाठी निर्माण केलेली एक निखळ, प्रामाणिक, पारदर्शक आणि प्रभावी यंत्रणा म्हणजेच ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क ग्लोबल (BBN Global) होय.

**बीबीएनजीचे व्हिजन आहे** – एक उद्योगसमृद्ध भारत उभा करणे आणि त्यासाठी प्रत्येक ब्राह्मण उद्योजकाला एकत्र आणणं, दर आणि दर्जा याबाबत तडजोड न करता आपल्या बांधवांना प्राधान्य द्यावे या साठी नेटवर्क उभे करणे.

बीबीएनजीने Networking आणि Giver is achiever च्या मंत्राचा वापर करून प्रत्येक सभासदाला बौद्धिक आणि सांपत्तिक क्षेत्रात परिपूर्ण करणे हे मिशन घेऊन आपले कार्य सुरु केलेले आहे.

**बीबीएनजीची वैशिष्ट्ये.**

१) **विश्वास** – हा आपल्या संस्थेचा आणि संस्थेच्या प्रत्येक सभासदाचा मूळ पाया आहे

२) **देणारा आणि मिळविणारा** – तुम्ही जगाला 'तुमचं सर्वोत्तम द्या, तुम्हाला जगातलं सर्वोत्तम मिळेल.' या पुराणातल्या व्याख्येनुसार 'जो देतो तोच मिळवतो' असे आमचे तत्त्व आहे. त्यामुळे आम्ही एकत्र येऊ ते देण्यासाठीच.

३) **नेटवर्किंग** (Networking) – जगात प्रत्येकजण एकमेकांशी कुठे ना कुठे जोडलेला असतो. त्यामुळे आपण एकमेकांशी जोडले तरच प्रगती शक्य आहे. बीबीएनजीचे ब्रीदवाक्य आहे समृध्द ब्राह्मण, संपन्न ब्राह्मण.'

नाशिक येथे सुरु झालेली ही चळवळ आता आपले कार्यक्षेत्र विस्तारत आहे. नाशिकमध्ये आठवड्याच्या प्रत्येक रविवारी आणि बुधवारी ब्राह्मण उद्योजक भेटतात. आपल्या व्यवसायाची माहिती करुन घेणे, व्यवसायाची देवाण-घेवाण करणे या व्यतिरिक्त प्रथितयश आणि यशस्वी उद्योजकांच्या भेटी अथवा ओळखी सर्व छोट्या मोठ्या उद्योग व्यवसायिकांना यानिमित्ताने होत आहेत. गेल्या दोन वर्षात काही करोड व्यवसायांची देवाण घेवाण या एकट्या नाशिकच्या मिटींगमध्ये झाली, बीबीएनजीचे हे यश सर्वश्रूत आहे. या यशस्वीतेमुळे आजअखेर बीबीएनजीचा शाखा विस्तार कल्याण, डोंबिवली, ठाणे, बोरीवली,

अंबरनाथ, पुणे, सांगली, कोल्हापूर, नंदुरबार, औरंगाबाद तसेच दुबई या ठिकाणी झालेला असून हजारो व्यावसायिक बीबीएनजीशी जोडले गेलेले आहेत. दुबई येथे शाखा सुरु झाल्यामुळे बीबीएनजी खऱ्याअर्थाने ग्लोबल झाले असून लवकरच ऑस्ट्रेलिया येथे शाखा सुरु होणार आहे. महाराष्ट्रातील विविध शहरांमधून कार्यरत असलेल्या सर्व ब्राह्मण संस्था बीबीएनजीचे कार्य पाहून संबधित शहरांमध्ये बीबीएनजीची शाखा सुरु करण्याच्या प्रयत्नात आहेत आणि हेच खरे बीबीएनजीचे यश आहे. खऱ्याअर्थाने संपन्न ब्राह्मण समृध्द ब्राह्मण होण्याच्या दृष्टीने बीबीएनजीची चाललेली वाटचाल समाजासाठी भुषणावह अशीच आहे.

# भावपूर्ण श्रद्धांजली



## कै. अरुण अनंत कुलकर्णी

अरुण अनंत कुलकर्णी यांचे नुकतेच निधन झाले असून मनमिळावू आणि मदतिला धावून जाणारे म्हणून ते सर्वज्ञात होते. गोखले एज्युकेशन सोसायटीच्या नाशिकरोड कॉलेजमध्ये लॅब टेक्निशियन म्हणून त्यांनी ३५ वर्षे सेवा केली.



## कै. विष्णू नारायण दीक्षित

मुखेड, ता. येवला येथील मूळ रहिवाशी सध्या नाशिक स्थित विष्णू नारायण दीक्षित यांचे २१ मार्च रोजी वयाच्या ७९ व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांचे पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दै. पुण्यनगरीचे उपसंपादक श्री. अनिल दीक्षित व श्री. दीक्षित आर्टचे दत्तात्रय दीक्षित यांचे ते वडील होते.

# हार्दिक अभिनंदन!

**सार्वजनिक वाचनालय,नाशिकच्या नुकत्याच झालेल्या पदाधिकारीं नियुक्ती करण्यात आली असून नूतन पदाधिकारी म्हणून संस्थेचे सभासद ॲड. अभिजित बगदे यांची नाट्यगृह सचिव पदी, ॲड. भानूदास शौचे यांची संस्थेचे सहसचिव म्हणून तर श्री. उदयकुमार मुंगी यांची गो. ह. देशपांडे उद्यान वाचनालय प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. संस्थेच्यावतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन!**


# जाहिर आवाहन

**संस्थेचे मुखपत्र 'सन्मार्गमित्र' या मासिकासाठी आपल्या संस्थेची, व्यवसायाची किंवा वैयक्तिक शुभेच्छा जाहिरात देऊन संस्थेच्या या अभिनव उपक्रमास चालना देऊन हातभार लावावा असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात येत आहे.**

जाहिरातीसाठी संपर्क

**0253- 2313599, 98812 48429, 98232 48335, 83789 76274**


## अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्यावतीने राबविण्यात येणारे उपक्रम

१. समाज गौरव पुरस्कार वितरण
२. प्रत्येक संकष्टी चतुर्थीला अथर्वशीर्षाचे आवर्तने व महाप्रसाद
३. होतकरू विद्यार्थी व नोकरी करणाऱ्यांसाठी होस्टेलची सुविधा.
४. सामुदायिक व्रतबंध
५. विघ्नहर्ता वधू-वर सहाय्यक वेबसाईट
६. विद्यार्थ्यांसाठी संस्कार शिबीरांचे आयोजन
७. महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी उत्सव
८. संस्थेच्या केंद्रांच्यावतीने स्थानिक पातळीवर हे आणि इतर अनेक उपक्रम राबविले जातात.



नाशिक केंद्र आयोजित गणेश याग क्षणचित्रे



नाशिक केंद्र आयोजित गणेश याग महापूजा




नाशिक केंद्र आयोजित गणेश याग क्षणचित्रे



मध्यवर्ती कार्यालयात स्वा. वीर सावकर जयंती प्रसंगी



नाशिक केंद्र आयोजित गणेश याग क्षणचित्रे






गुढीपाडव्या निमित्त नववर्ष यात्रेचे स्वागत करताना मध्यवर्ती संस्था पदाधिकारी

## ‘सन्मार्ग मित्र’ लेखन पाठविण्याकरिता सुचना

१. राजकिय विषय सोडून कोणत्याही प्रकारचे लिखाण पाठवावे.
२. लिखाण कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहिलेले अथवा टाईप केलेले असावे.
३. ब्राह्मण समाजातील विविध संस्था कार्यरत आहेत. त्यांनी आपआपल्या संस्थांच्या कार्यक्रमाचे वृत्तांत मुद्देसुद पाठविल्यास त्या लिखाणाला प्राधान्य देण्यात येईल.
४. प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत लिखाण संस्थेच्या कार्यालयात पोहोचेल या बेताने ते पाठवावे.
५. मासिकाच्या ध्येय धोरणाला अनुसरुन लिखाणामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार संपादकांनी राखून ठेवला आहे.
६. लिखाण स्वीकृत अगर अस्वीकृत करणे संपादकांच्या अधिकारात राहिल. अग्राह्य लिखाणास कारण देण्याचे बंधन संपादकांवर नाही. तसेच लिखाणास कोणतेही मानधन दिले जाणार नाही.
७. मासिकात व्यक्त होणाऱ्या मतांशी संस्था किंवा संपादक सहमत असतीलच असे नाही.

## * विनम्र आवाहन *

१. संस्थेच्या सर्व सभासदांनी आपला बदललेला अथवा नवीन पत्ता, फोन नंबर, मेल आयडी इत्यादी संस्था कार्यालयात येऊन अथवा पत्राद्वारे अपडेट करावा ही विनंती.
२. ब्राह्मण समाजातील सर्व जाती, पोट जातीच्या समाजबांधवांनी अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे सभासद व्हावे ही नम्र विनंती. (आजीव सभासद वर्गणी रु. ५०१/- मात्र) सभासदत्वाचा अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असून आपले ओळखपत्र, निवासाचा पत्ता व एक फोटोसह आपला विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयात भरुन द्यावा.

## संस्थेची केंद्र कार्यालये

| | |
|---|---|
| **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक केंद्र**<br>**केंद्र प्रमुख : श्री. महेश शुक्ल,** मो. : ९८८११२४१४४<br>जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबल जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक - ४२२ ००२. फोन : २५७२३२६ | **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पंचवटी, नाशिक**<br>**केंद्र प्रमुख : श्री. प्रदिप भानुवंशे** मो. : ७९७२२४२१६५<br>घर नं. ४४७७, भानुवंशे वाडा, भोंडे गल्ली, कपालेश्वर मंदिरामागे, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३ |
| **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पुणे केंद्र**<br>**प्रभारी केंद्र प्रमुख : ॲड. गणेश गोखले**<br>‘कौशिक’, १२९३, सदाशिव पेठ, पुणे -३०.<br>फो : ०२०-२४४३६९२२ | **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, जुन्नर केंद्र**<br>**केंद्र प्रमुख : श्री. रामचंद्र वैद्य**<br>मो. : ९९७५६०३७७६<br>बेलवलकर सभागृह, बुधवार पेठ, जुन्नर, जि. पुणे |
| **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नीरा केंद्र**<br>**केंद्र प्रमुख : श्री. दत्तात्रय त्रिंबक बडबडे**<br>मो. : ९८२३३२६६८४<br>समर्थ बंगला, बाजार तळ, मराठी शाळे मागे, नीरा, ता. पुरंदर जि. पुणे | **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, फलटण केंद्र**<br>**केंद्र प्रमुख : श्री. भालचंद्र दत्तात्रय ताथवडकर**<br>मो. : ९८६०७२८६९८<br>११८, कसबा पेठ, सईबाई शॉपिंग सेंटरमागे, फलटण, जि. सातारा |
| **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, शिरुर केंद्र**<br>**केंद्र प्रमुख : श्री. व्ही. डी. कुलकर्णी**<br>मो. : ९८२२२६९९६१<br>१७३५/५०, हुडको, घोड नदी, शिरुर - ४१२२१० | **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, विश्रांतवाडी, पुणे केंद्र**<br>**केंद्र प्रमुख : श्री. विजय कर्जतकर**<br>मो. : ९४२१०११८००<br>माझदा कॉर्नर, ३२, गाळा नं. ४, कस्तुरबा सोसायटी |



पुणे केंद्र आयोजित पाककला स्पर्धेचे विजेते



पुणे केंद्र आयोजित प्रदर्शनास मान्यवरांची भेट






निरा केंद्र आयोजित स्वा. वीर सावकर जयंती उत्सव प्रसंगी बोलताना मान्यवर व उपस्थित जनसमुदाय

**ए. पी. केटरर्स**

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था,
जलशुद्धिकरण केंद्रा शेजारी,
त्र्यंबक रोड, नाशिक



**पेशवाई केटरर्स**

श्री लक्ष्मीनारायण भवन,
हॉटेल साई पॅलेसमागे,
मुंबई आग्रा रोड, नाशिक

रुचकर भोजन, स्वच्छता व वक्तशीरपणा हाच आमचा बाणा!

सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी हॉल व केटरींगची उत्तम व्यवस्था व सुयोग्य व्यवस्थापन
मुलीच्या बारशाला, मुलीच्या वाढदिवसाला, एकाहत्तरी, पंचाहत्तरी, सहस्त्र चंद्रदर्शन तसेच सेवानिवृत्तीच्या

**कार्यक्रमास हॉल मोफत***

**श्री. प्रमोद पंडित**
भ्रमणभाष : ८४४६९३०२४२

**श्री. अजय आगाशे**
भ्रमणभाष : ९६८९८९४१११

* नियम व अटी लागू




अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था आयोजित समाज गौरव पुरस्कार वितरण प्रसंगी प. पू. प्रतापे महाराजांसमवेत पुरस्कारार्थी, संस्थेचे अध्यक्ष, ॲड. गणेश गोखले, कार्याध्यक्ष उदयकुमार मुंगी व कार्यवाह अजित चिपळूरकर





अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था पंचवटी केंद्र आयोजित गुढीपाडव्या निमित्त नववर्ष स्वागत शोभायात्रा



श्री गणेशयाग महाआरती प्रसंगी उपस्थित समाजबांधव

बुक–पोस्ट

प्रति,

श्री. ---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------